N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/01/2026 20:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 27/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/11/2025
**Time From (वेळेपासून):** 12:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/01/2026 **Time (वेळ):** 20:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 013
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/01/2026 20:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहसंचालक कार्यालय,विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सोपान सोनाजी चिट्टमपल्ले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,सरकारी दवाखान्या शेजारी,बीड ,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,सरकारी दवाखान्या शेजारी,बीड ,बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): पोलीस अधिकारी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9518973185

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय मार्तंड जगताप | | वडील का नाम : मार्तंड | 1. 309 ,जेल रोड, सैलानी बाबा स्टाप,गोल्डन नेस्ट सोसायटी, नाशिक,नाशिक,उपनगर,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 60 नोटा | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

30,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
दि.15/01/2026.
मी सोपान सोनाजी चिट्टमपल्ले, वय 43 वर्षे व्यवसाय-नौकरी, पोलीस उप-अधीक्षक लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बीड मो.नं.9270221064, 9518973185.
सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.ठा.वेदांतनगर, छत्रपती संभाजीनगर येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे दि.31/05/2025 पासून पोलीस उप अधीक्षक म्हणून कार्यरत आहे.
दि.26/11/2025 रोजी अर्जदार धम्मपाल निवृत्तीराव घुंबरे,वय-42 वर्ष, व्यवसाय नौकरी, प्राध्यापक कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार ता. शिरूर कासार जि.बीड हे आम्हास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे येवून समक्ष भेटले व त्यांची एका लोकसेवका विरुध्द तक्रार असल्याचे सांगुन आपण देवगिरी महाविद्याल छ.संभाजीनगर परिसर येथे सुरक्षीत ठिकाणी येवुन त्यांची सविस्तर तक्रार घेवुन कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली. त्यावर आम्ही मा.पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छ. संभाजीनगर यांचे परवानगीने लागलीच मा.अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. जालना रोड, बीड. यांना ला.प्र.वि.बीड गोपनिय जा.क्र.34 दि.26/11/2025 गोपनिय कामकाज कामी दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले व सदर पंच हजर आले नंतर आम्ही सफौ. सांगळे, पोलीस अंमलदार श्री.राठोड, श्री.गवळी, श्री.सुरवसे व चालक श्री.पुरी व दोन्ही पंच यांना सुचना दिल्या की, सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक त्या सर्व साहित्या सह दि.27/11/2025 रोजी 09.00 वा. छत्रपती संभाजीनगर येथे जावुन तक्रारदार यांची सविस्तर तक्रार घेवुन कारवाई करणे असल्याचे कळविले. त्यावरुन दि. 27/11/2025 रोजी सफौ.सांगळे, पोलीस अंमलदार श्री.राठोड, श्री.गवळी, श्री.सुरवसे व चालक श्री.पुरी व दोन्ही पंच असे सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक त्या सर्व साहित्यासह ला.प्र.वि, बीड येथुन शासकीय वाहन क्र. MH 23BH-2668 ने 09.30 वा रवाना होवून 11.40 वा. देवगिरी महाविद्यालय परिसर छत्रपती संभाजीनगर येथे पोहचून तक्रारदार श्री.घुंबरे यांना संपर्क केला असता ते 11.50 वा. देवगिरी महाविद्यालय परिसर छत्रपती संभाजीनगर येथे हजर आले. आम्ही तक्रारदार यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनीत्यांचे नाव धम्मपाल निवृत्तीराव घुंबरे, वय-42 वर्ष, व्यवसाय-नौकरी, प्राध्यापक कालिकादेवी महाविद्यालय शिरूर (का.) ता.शिरूर(का.) जि.बीड असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार धम्मपाल निवृत्तीराव घुंबरे यांना सापळा पथकातील सदस्य व पंचांचा परिचय करुन दिला. त्यानंतर नियोजीत सापळा कारवाईचे अनुषंगाने श्री.अंबुरे यांची पंच क्रमांक 1 म्हणुन व श्री.उबाळे यांची पंच क्रमांक 2 म्हणून नेमणूक करण्यात आली. आम्ही तक्रारदार धम्मपाल निवृत्तीराव घुंबरे यांना तक्रारी बाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष तक्रार लिहुन दिली की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ छ. संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.ACAD/AFFIL/CARRADV/YPS/2025-26/7163-68 Date 13-11-2025 अन्वये माझी व माझे दोन सहकारी यांचे स्थान निश्चिती (CAS)पदोन्नती अंतर्गत सहयोगी प्राध्यापक पदासाठी मान्यता दिल्याने प्राचार्य, आदर्श शिक्षण संस्था संचालीत, कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार जि.बीड यांनी जा.क्र. कKMS/2025-26/303, Date 14-11-2025 अन्वये माझी व 1)डॉ.चौधर उध्दव निवृत्ती 2)डॉ.संपाळ संदीप नारायण यांचे वेतन निश्चिती प्रस्ताव, मुळ सेवा पुस्तीका, विदयापीठ मान्यता पत्र, मुल्यांकन प्रस्ताव असे सादर केले होते दिनांक 19-11-2025 रोजी कालिकादेवी महाविद्यालयात सहसंचालक कार्यालयातील डॉ.पंकजा वाघमारे मॅडम, (सहसंचालक,) श्री संजय एम.जगताप



Scanned with OKEN Scanner

(प्रशासकीय अधीकारी ) व गायकवाड (लिपिक )यांनी धावती भेट दिली असता मी, श्री.जगताप यांची भेट घेवून माझ्या व डॉ.चौधर, डॉ.संपाळ यांचा वेतन निश्चिती प्रस्ताव मंजूर झाला का ? अशी विचारणा केली असता त्यांनी मला आमचे कॉलेजचे बाथरुमकडे नेहुन श्रीमती वाघमारे मॅडम यांनी माझी सहयोगी प्राध्यापक पदाच्या प्रपोजलवर सही केल्याचे 10,000/-रुपये व स्वतःसाठी माझ्या वेतन निश्चीतीचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी 10,000/-रु असे एकुण 20,000/- रुपये तात्काळ घेतले होते व वेतन निश्चीतीचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी प्रत्येकी 15,000/- (पंधरा हजार रूपये) प्रमाणे तिघांचे 45000/- (पंचेचाळीस हजार) रुपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सध्या माझ्याकडे 45000 हजार रूपये नाहीत. असे म्हटल्या नंतर तुम्ही तयारीने माझ्या कार्यालयात या मी तुमचा वेतन निश्चितीचा प्रस्ताव मंजुर करतो असे म्हणून माझ्याकडे तिघांचे मिळून 45000 हजार रूपये लाच मागणी केली आहे. माझ्या ओळखीचे प्राध्यापक श्री. विक्रम धनवे सर यांचे सुध्दा वेतन निश्चीती प्रस्ताव मंजुरीसाठी 10,000/- रुपये त्यांचेकडुन दिनांक 18/06/2025 रोजी घेतले आहेत. श्री. जगताप हे छत्रपती संभाजीनगर विभागातील प्रत्येक प्राध्यापकाकडुन वेतन निश्चीती प्रस्ताव मंजुर करण्यासाठी प्रत्येकी पंधरा ते वीस हजार रुपये घेतल्याशिवाय प्रस्ताव मंजुर करत नाहीत. " वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने त्याची तक्रार पंचारामक्ष घेवुन तक्रार व कागदपत्रावर आम्ही, पंच, तक्रारदार यांनी शासकीय वाहनात सहया केल्या.

तक्रारदार श्री.घुंबरे यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि.27/11/2025 रोजी आम्ही लोकसेवक श्री.जगताप हे तक्रारदार यांचेकडे (CAS) अंतर्गत वेतन निश्चितीस मंजुरी देणे बाबत लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे यांना लोकसेवक श्री.जगताप यांचेकडे त्यांचे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन व्हाईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/राठोड यांनी व्हाईस रकॉर्डर तक्रारदार यांचेकडे सुरक्षीत ठिकाणी ठेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे यांना लोकसेवक श्री.जगताप यांची भेट घेण्यासाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे 12.57 वा. पायी रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे हे पायी13.14 वा. सुरक्षित ठिकाणी देवगिरी महाविद्यालय परिसर छत्रपती संभाजीनगर येथे परत आले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण शासकीय वाहनात ऐकले असता, तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे असे लोकसेवक श्री.जगताप यांचे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे गेले असता त्या ठिकाणी तक्रारदार व लोकसेवक श्री.जगताप यांची भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांचे व इतर दोघांचे वेतन निश्चिती प्रस्ताव मंजूरी देण्यासाठी लोकसेवक श्री.जगताप यांनी इतर लोक (15) पंधरा आणि (20) वीस करतात असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे प्रत्येकी 15000/- रूपये प्रमाणे तीघांचे मिळुन 45000/- रुपये लाचेची मागणीकेली. त्या नंतर तडजोडअंती लोकसेवक श्री.जगताप यांनी " डिस्कांउंट करा त्यांच्यात दहा दहा हजार देवु टाका " असे म्हणुन प्रत्येकी 10,000/- रुपये प्रमाणे तिघांचे मिळुन 30,000/- रुपये स्वतःसाठी व वरिष्ठांसाठी लाचेची मागणी करुन लाच रक्कम 30,000/- लागलीच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार यांनी "ठिकयं..दहा दहा हजार रुपये देतो तिघांचेही देतो सर, आलो दहा मिनीटात" असे म्हणुन तक्रारदार व पंच क्र.1 अंबुरे सुरक्षित ठिकाणी परत आले.

त्यानंतर लागलीच लाचमागणी पडताळणी वरुन लोकसेवक श्री.जगताप, प्रशासकीय अधीकारी, विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय यांचे विरुध्द विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे तक्रारदार यांना सांगितले. त्यावरुन देवगिरी महाविद्यालय परिसर येथे शासकीय पंचासमक्ष आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना शासकीय वाहनात अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या ज्यामध्ये 500/-रु. दारच्या 60 नोटा असे एकुण 30,000/- रु. लाच रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना लाचस्वीकृती नंतर करावयाचा ईशारा आम्हास आमचे मोबाईवर फोन करुन "काम झालय सर" असे बोलण्याचा इशारा नेमुन दिला व वेळे अभावी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करुन लाचमागणी पडताळणी, सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा सापळा कारवाई झाल्यानंतर एकत्रीत करण्यात येणार असल्याचे आम्ही पंच व तक्रारदारास सांगीतले.

त्यानंतर सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे कडे सुरक्षीत ठेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे यांना लोकसेवक श्री.जगताप यांना लाच रक्कम देण्यासाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे 14.07 वा. पायी रवाना केले. त्याचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र. 2 श्री. उबाळे व सापळा पथक पायी रवाना झालो. तक्रारदार पंच क्र. 1 असे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे गेले त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे इशारा न करता वापस निघाले त्यांचे पाठो-पाठआम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक सुरक्षित ठिकाणी देवगिरी महाविद्यालय परिसर येथे शासकीय वाहनाजवळ 14.24 वा. हजर आलोत. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार व लोकसेवक श्री.जगताप यांची कार्यालयाचे समोरील पोर्च मध्ये भेट झाली असता लोकसेवक श्री.जगताप हे कार्यालयाचे बाहेर निघाले त्यावेळी जाताना लोकसेवक श्री.जगताप हे "दिल नां, झालंना सगळ, बोला बोला.." असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी दोन मिनीट ऐका..आणलेत असे बोलले असता, लोकसेवक श्री.जगताप हे "आलो मी " असे म्हणुन सहसंचालक श्री.वाघमारे मॅडम यांचे सहगाडीत बसुन निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार श्री.घुंबरे यांनी लोकसेवक श्री.जगताप हे कार्यालयात आल्या नंतर सापळा कारवाई पुन्हा अजमावी अशी विनंती केल्याने पुन्हा लोकसेवक श्री.जगताप हे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे आल्या नंतर सापळा आजमावन्याचे सर्वानुमत्ते ठरले.
त्यानंतर काही वेळाने लोकसेवक श्री.जगताप हे कार्यालयात जाताना दिसले. त्यावेळी आम्ही लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करून व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांचेकडे सुरक्षीत ठेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार व पंच क्र.1 श्री.अंबुरे यांना लोकसेवक श्री.जगताप यांना लाच रक्कम देण्यासाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे 18.23 वा.पायी रवाना केले. त्याचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 श्री.उबाळे व सापळा पथकपायी रवाना झालो. तक्रारदार पंच क्र.1 असे विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथे गेलेत्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे इशारा न करता वापस निघाले त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक सुरक्षित ठिकाणी देवगिरी महाविद्यालय परिसर येथे शासकीय वाहनाजवळ 19.02 वा. हजर आलोत. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि/राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 यांना स्वतंत्र विचारपुस करून व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार यांची व लोकसेवक श्री.जगताप यांची भेट झाली असता तक्रारदार श्री.घुंबरे हे लोकसेवक श्री.जगताप यांना म्हणाले की, "तुम्ही म्हणालात तसे तीस हजार आणलेलेत.." त्यावर लोकसेवक श्री.जगताप म्हणाले की, "आहो सर पैशांचा नाही, तसं तुम्ही घेवुन जा, तुमच तुमच दिलंना, तुम्हाला काही सगळ्यांच्या सह्या झाल्यात, देवु नका पण तुमच्या सह्या झाल्या घेवुन जाना विषय त्यांचा, विषय काहीच नाही त्यांचा, असे म्हणुन लोकसेवक श्री.जगताप यांनी त्यांचेकडील तक्रारदार यांचे काम पुर्ण झाल्याने तसेच त्यांना तक्ररदार यांचा व पंचाच्या हालचालीवर संशय आल्याने ते यापुढे देखील तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत अशी तक्रारदार यांची खात्री झाली असुन आज पर्यंत झालेल्या कारवाईवर लोकसेवक श्री.जगताप यांंचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी " अशी विनंती तक्रारदार यांनीकेली.
त्या नंतर आम्ही सापळा कारवाई स्थगीत करुन तक्रारदार यांचेकडील ऍंथ्रोसिन पावडर लावलेली लाच रक्कम 30,000/- रुपये ताब्यात घेवुन लिफाफामध्ये बंद करुन ताब्यात घेतले. उर्वरित सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा ला.प्र.वि.बीड येथे जावून करण्याचे ठरले. त्यावरून आम्ही, पंच, सापळा पथकासह शासकीय वाहनाने व तक्रारदार हे त्यांचेकडील वाहनाने देवगिरी महाविद्यालय परिसर छ.संभाजीनगर येथुन 20.00 वा. रवाना होवून 23.10 वा. ला.प्र.वि. बीड येथे येवून लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई स्थगितीचा पंचनामा केला.
दि.04/12/2025,दि.16/12/2025,दि09/01/2026व 15/01/2026 रोजी तक्रारदार श्री.घुंबरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय बीड येथे हजर येवुन लेखी जबाब दिला की, लोकसेवक श्री.जगताप यांनी माझे व इतर दोघांचे त्यांचेकडील प्रलंबित काम पुर्ण करुन ते वैद्यकीय रजेवर गेले असुन त्यांचा मोबाईल बंद असुन त्यांना माझ्याबदल सापळा कारवाई दरम्यान संशय आल्याने त्यांनी सत्र न्यायालयात अटक पुर्व जामीनासाठी अर्ज दाखल केल्याने व त्यांनी माझे काम करुन दिल्याने ते आता माझ्या कडुन पैसे स्विकारणार नाहीत असे मला वाटते त्यामुळे आपण त्याचे विरुध्द झालेल्या कारवाई वरुन पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करावी." वगैरे मजकुराची हकिगत सांगत असल्याने तसा त्यांचा दि.04/12/2025,दि.16/12/2025,दि09/01/2026व 15/01/2026 रोजी सविस्तर जबाब नोंदविलेले आहेत. लोकसेवक श्री.जगताप हे तक्रारदार यांचेकडुन पैसे घेणार नाहीत अशी तक्रारदार यांची खात्री झाली आहे." म्हणुन आम्ही सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देण्याचा निर्णय घेतला. आम्ही सरकार तर्फे फियांदी होवुन फिर्याद देण्याचा निर्णय घेतला.



Scanned with OKEN Scanner

तरी लोकसेवक श्री.संजय मार्तंड जगताप, प्रशासन अधीकारी, सहसंचालक कार्यालय, विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, छ.संभाजीनगर रा.बिट्स हॉटेलच्या समोर, पेट्रोल पंपाच्या मागच्या बाजुला, स्टेशन रोड, छ.संभाजीनगर मुळ राहणार सैलानी बाबा स्टॉप, जेल रोड, अंबेडकर नगर जवळ नाशिक (वर्ग-1) यांनी दि.27/11/2025 रोजी 12.57 वा. ते 13.14 वा.चे दरम्यान विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण छ. संभाजीनगर कार्यालय येथेतक्रारदार श्री.घुंबरे यांचे व इतर दोघांचे वेतन निश्चिती प्रस्ताव मंजूरी देण्यासाठी लोकसेवक श्री.जगताप यांनी तक्रारदार यांचे कडे प्रत्येकी 15000/- रूपये प्रमाणे तीघांचे मिळुन 45000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती केली. त्या नंतर तडजोडअंती लोकसेवक श्री.जगताप यांनी "डिस्कांउंट करा त्यांच्यात दहा दहा हजार देवु टाका " असे म्हणुन प्रत्येकी 10,000/- रुपये प्रमाणे तिघांचे मिळुन 30,000/- रुपये स्वतःसाठी व वरिष्ठांसाठी लाचेची मागणी करुन लाच रक्कम 30,000/- लागलीच स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन माझी लोकसेवक लोकसेवक श्री.संजय मार्तंड जगताप प्रशासन अधीकारी, सहसंचालक कार्यालय, विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर. (वर्ग-1) रा. बिट्स हॉटेलच्यासमोर, पेट्रोल पंपाच्या मागच्या बाजुला, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, मुळ रा . 309 गोल्डन नेस्ट सोसायटी, सैलानी बाबा स्टॅप, जेल रोड, अंबेडकर नगर जवळ नाशिक यांचे विरुध्द कलम 7, 7-अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे फिर्याद आहे.

हि फिर्याद दिलीते माझेसांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B [illegible]

I.I.F.-I [illegible]

12. Signature/Thumb impression of the complainant / informant.
[illegible]

13. Date and time of dispatch to the court
[illegible]

Signature of Officer in charge, Police Station
[illegible]

Name [illegible]: [illegible]

Rank [illegible]: I (Inspector)

No. [illegible]:

Scanned with OKEN Scanner